ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वार्षिक वर्गणी : ६ रु.
टेलि. ५५६२७
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, ४ मार्च, १९६४ | अंक ५

## विविध माहिती

**ब्रह्मदेशांतील विमा कंपन्या**—ब्रह्मदेशांतील क्रांतिकारी सरकारनें तेथील सर्व खाजगी विमा कंपन्यांना आपला कारभार गुंडाळण्याची सूचना केली आहे. ह्या बाबतींत ब्रह्मी अगर परदेशीय कंपन्या ह्यांच्यांत भेदभाव करण्यांत आलेला नाहीं. ह्या कंपन्यांनीं पुढील वर्षाच्या जानेवारी महिनाअखेर आपला कारभार बंद करण्याची तरतूद करावी, असा हुकूम त्यांच्यावर बजावण्यांत आला आहे.

**दूध निर्जंतुक करणारें देशी यंत्र**—दूध निर्जंतुक बनविण्याच्या पहिल्या देशी यंत्राचें उद्घाटन नुकतेंच करण्यांत आलें. परदेशांतून आयात केलेल्या अशा यंत्रापेक्षा देशी यंत्राची किंमत बरीच कमी म्हणजे अवघी ५ हजार रुपये आहे. यंत्राच्या साह्यानें दर तासाला २२ मण दूध निर्जंतुक करतां येतें. तें करवीर तालुका सहकारी संघातर्फे तयार करण्यांत आलें आहे. ह्या यंत्राचें व्यापारी उत्पादन करण्यांत येणार आहे.

**दंगलीचा आर्थिक परिणाम**—पूर्व पाकिस्तानांत झालेल्या हिंदू-विरोधी दंग्याचे पडसाद कलकत्त्यांत उठून तेथेंहि जातीय दंगल उसळली होती. ह्या दंगलीच्या परिणामीं कलकत्त्यामधील ४ रबराचे व ५ इतर कारखाने संपूर्णतः अगर अंशतः उध्वस्त झाले. त्यामुळें सुमारें १,१००वर कामगारांना रोजगारांना मुकावें लागलें. दंगलीमुळें झालेल्या अनिष्ट आर्थिक घटनांची व्याप्ति एवढ्या पुरतीच मर्यादित नाहीं.

**कर्जाची परतफेड**—भारत सरकारनें आंतरराष्ट्रीय नाणें निधीमधून घेतलेल्या कर्जापैकी कांहीं रक्कम परत करण्यास प्रारंभ केला आहे. १९६१ च्या ऑगस्टच्या प्रारंभीं सरकारनें निधीमधून २५ कोटी डॉलर्स कर्जाऊ घेतले होते. त्यांपैकी २·५ कोटी डॉलर्स म्हणजे सुमारें ११·९ कोटी रुपये परत करण्यांत आले आहेत. सर्व कर्जाची परतफेड १९६६ च्या जुलैअखेर करावयाची आहे.

**युरोपची सामायिक बाजारपेठ**—युरोपच्या सामायिक बाजारपेठेंत भारताला अधिक माल निर्यात करता यावा म्हणून त्या संघटनेनें भारताच्या मालावरील जकातीबाबत सैल धोरण स्वीकारावें अशी विनंती करण्यांत आली आहे. गेल्या वर्षीं जकातीबाबत भारताला कांहीं सवलती देण्यांत आल्या आहेत. परंतु त्या अपुऱ्या वाटत आहेत.

**अमेरिकेंतील हृदयविकार**—आर्थिक स्पर्धा तीव्र असलेल्या अगर होत असलेल्या देशांत हृदयविकाराचें प्रमाण अधिक आढळून येतें. अमेरिकेंत किमान १·५ कोटी लोकांना ह्या ना त्या प्रकारच्या हृद्रोगानें पछाडलेले आहे. ह्या विकारामुळें अमेरिकेंत दरसाल ९ लाख माणसें दगावत असावींत असा अंदाज आहे.

**जगप्रवाशांना भारताचें आकर्षण**— हॉलंड-अमेरिका मार्गावर प्रवास करणारी ' रॉटरडॅम ' ही विलासी बोट ७१४ प्रवाशांना घेऊन मुंबईला आली होती. ह्या बोटीनें ८० दिवसांची जगाची एक सफर काढलेली असून जगांतील मोजक्याच ठिकाणीं ती थांबणार आहे. ही बोट मुंबईमध्यें ५ दिवस थांबली. कारण, बोटीवरील पुष्कळ प्रवाशांना भारतांमधील शक्य तितकीं अधिक प्रेक्षणीय स्थळें पाहाण्याची इच्छा होती. इतर कोठल्याहि देशाच्या बंदरांत बोटीनें एवढा मुक्काम केलेला नाहीं. ' रॉटर डॅम ' बोटींतून प्रवास करण्याची संधि घेण्यास परदेशीय प्रवासी विशेष उत्सुक असतात. कारण, बोटीवर त्यांची बादशाही व्यवस्था ठेवण्यांत येते. अमेरिकेंतील एका जोडप्याची तर जगप्रवासाची ही १९ वी खेप आहे. दरसाल ८० दिवसांची जगाची सफर काढण्याचा त्यांचा शिरस्ताच आहे.

**भारत-बल्गेरिआ व्यापारी करार**—भारत आणि बल्गेरिआ ह्यांच्या दरम्यान पांच वर्षे मुदतीचा व्यापारी आणि पैशांच्या देण्याघेण्याचा करार करण्यांत आला आहे. करार १९६४ च्या प्रारंभापासून अंमलांत येणार आहे. करारांतील अटीप्रमाणें १९६४ सालीं उभयतां देशांत ९ कोटी रुपये किमतीच्या मालाची आणि १९६५ सालीं १०·५ कोटी रुपये किमतीच्या मालाची देवाण-घेवाण व्हावयाची आहे.

**मुंबईंत नवें इस्पितळ**—नायजेरिआंत रेशमाचा मोठा व्यापार करणाऱ्या एका धनिकानें मुंबईंत एक इस्पितळ काढण्याची तयारी दाखविली आहे. हें इस्पितळ सुप्रसिद्ध मेयो इस्पितळाच्या धर्तीवर काढण्याची त्याची इच्छा आहे. इस्पितळांत १०० रुग्णांची सोय करण्यांत यावयाची आहे. इस्पितळाच्या स्थापनेसाठी ९० लाख रुपये खर्च येईल व तें मुंबई कॉर्पोरेशनतर्फे चालविलें जाईल. इस्पितळाचा दाता अनामिक राहूं इच्छितो.

**मद्रास राज्यांतील वीजपुरवठा**—मद्रास राज्याच्या वीज बोर्डानें १९६३ च्या एप्रिल पासून १९६४ च्या जानेवारी अखेर १,४३७ खेडेगांवांना विजेचा पुरवठा चालू केला. आतांपर्यंत १६,४९७ खेड्यांना विजेचा पुरवठा करण्यांत आलेला आहे. अजून सुमारें २,००० वर खेड्यांना विजेचा पुरवठा करण्याचें काम राहिलें आहे.

**फ्रान्सच्या संरक्षण खात्याचें प्रतिनिधिमंडळ**—फ्रेंच सरकारच्या संरक्षण व परराष्ट्र खात्याचें एक प्रतिनिधिमंडळ लवकरच भारतांत येणार आहे. फ्रान्स व चीन ह्यांनीं परस्परांना राजनैतिक मान्यता देण्याचें ठरविलें असलें तरी त्यामुळें फ्रान्स व भारत ह्यांच्या संबंधांत बिघाड होण्याचें कारण नाहीं, असा ह्याचा अर्थ करण्यांत येत आहे.

### किनाऱ्यालगतच्या जमिनीची धूप

केरळ राज्य हें भारतामधील सर्वांत दाट लोकवस्तीचें आहे. ह्या राज्यांत दर डोई जमिनीचें सरासरी प्रमाणहि त्यामुळें अल्प आहे. त्यांतच राज्याच्या पश्चिम किनाऱ्याला सतत धडका मारणारा समुद्र दरसाल १५ ते ३० रुंदीचा पट्टा गिळंकृत करीत असतो. समुद्राच्या आक्रमणाची ही भीति घालविण्यासाठी २०० मैल लांबीच्या किनाऱ्यावर बांधबंदिस्ती व इतर उपाय योजण्यांत येत आहेत. परंतु जरूरीच्या मानानें ते अपुरे पडत आहेत. १९६१ सालापर्यंत अवघ्या १५ मैल लांबीच्या किनाऱ्याला भिंतीचें संरक्षण देण्यांत आलेलें आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या कामासाठी ३६० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आलेली आहे. पण ह्या कामाची पूर्वता करावयाची तर २५ कोटी रुपयांच्या आतबाहेर खर्च करावा लागेल. केरळ राज्याप्रमाणेंच महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावरहि अनेक ठिकाणीं जमिनीची धूप चालू आहे.

### अमेरिकन शेतकऱ्यांचा दौरा

अमेरिकेंत शेती करणाऱ्या सात शेतकऱ्यांचा आणि त्यांच्या पत्नींचा एक गट भारताच्या दौऱ्यावर आला आहे. भारतांमधील शेतकरी कुटुंबांत राहून त्यांच्या जीवनाची व उत्पादनपद्धतीची माहिती करून घेण्यासाठी आलेला हा पांचवा अभ्यासगट आहे. ह्या गटाचा दौरा सात आठवड्यांचा आहे. हिंदमधील फार्मर्स फोरम आणि त्याच धर्तीची अमेरिकन संघटना ह्यांनीं दौऱ्यांचा उपक्रम केलेला आहे. अमेरिकेंतून आलेल्या ह्या गटांतील एका पुढाऱ्यानें असें मत व्यक्त केलें आहे कीं भारतामधील शेतकऱ्यांनीं शेतीचीं अधिक चांगलीं अवजारें आणि अधिक चांगले बैल ह्यांचा वापर करणें जरूर आहे. भारताच्या शेतीप्रधान अर्थव्यवस्थेंत बैलांच्या वापरास अद्यापहि खूप जागा आहे.

### छोट्या उद्योगधंद्यासाठी यंत्रसामग्री

भारताचें नॅशनल स्मॉल इंडस्ट्रिज कॉर्पोरेशन आणि जपानमधील छोट्या उद्योगधंद्यांच्या यंत्रसामग्रीच्या कारखान्यांची संघटना ह्यांच्या दरम्यान एक करार करण्यांत आला आहे. कराराला अनुसरून जपानी कारखान्यांची संघटना भारतामधील छोट्या उद्योगधंद्यांना लागणारी १० लाख डॉलर्स किंमतीची यंत्रसामग्री पुरविणार आहे. जपाननें भारताला जें कर्ज दिलें आहे, त्यांतून यंत्रसामग्रीची किंमत चुकती करण्यांत येणार आहे. संबंधित यंत्रसामग्रीचा पुरवठा सुरळींत करण्याची हमी जपानी कारखानदारांनीं दिली आहे. भारत आणि जपान ह्यांच्या दरम्यान झालेला अशा प्रकारचा हा दुसरा करार आहे. छोट्या उद्योगधंद्यांना लागणारा भांडवली स्वरूपाचा मालच भारत खरेदी करणार आहे.

### प्रो. द. गो. कर्वे व श्री. एम्. आर. भिडे

प्रो. द. गो. कर्वे ह्यांच्या, रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नरपदाची मुदत २९ फेब्रुवारी १९६४ रोजीं संपली; त्यांनीं आपल्या जागेचा चार्ज नवे डेप्युटी गव्हर्नर श्री. एम्. आर. भिडे ह्यांस दिला. 'ट्रेनिंग' चे सल्लागार ह्या नात्यानें ते रिझर्व्ह बँकेला ह्यापुढेंहि मदत करीत राहातील. इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिक्सचे अध्यक्ष आणि इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह अलायन्सच्या रिजनल एज्युकेशन सेंटरच्या ॲड्व्हायसरी कौन्सिलचे चेअरमन, ह्या जागीं ते पूर्ववत जातील.


तुमचें स्थान कोणतें ?
लेखक : श्री. वा. काळे
पृ. सं. १२० ] ◆ [ किं. २ रु.




बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
गिरगांव, मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

आतां ४ टक्के व्याजाची नवीन योजना



रिकरिंग डिपॉझिट स्कीम



महाराष्ट्र बँकेच्या रिकरिंग डिपॉझिट खात्यामध्यें दरमहा रु. १०/- अथवा दहाच्या पटींत रु. ५००/- पर्यंत कोणतीहि एक रक्कम टाकून ती सतत २४ महिने भरली असतां त्याचे शेवटीं तुम्हांस ४ टक्यानें व्याजासह रक्कम परत मिळते. उदाहरणार्थ—तुम्ही दरमहा रु. १०/- प्रमाणें दोन वर्षें पैसे भरले असतां मुदतीच्या अखेरीस रु. २५०/- परत मिळतात.

या योजनेंत भरपूर व्याज मिळतें आणि नियमितपणें बचतहि होतें.

मोफत माहिती पत्रकासाठीं लिहा अगर बँकेच्या शाखेत येऊन भेटा.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड
मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें-२

Pratibha-62-4

# अर्थ

बुधवार, ४ मार्च, १९६४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भागीदारांचें लक्ष चहा-चिवड्याच्या बोनसवर !

वार्षिक सभेचे वेळीं 'मालकांना' खाऊ घालणारे 'नोकर' भागीदारांचें लक्ष मोफत 'बोनस'कडे वेधून सभा कशा पार पाडतात, ह्याचीं उत्कृष्ट उदाहरणें पुष्कळ वेळां बघावयास मिळतात. आपल्याकडील कांहीं कंपन्यांची, वार्षिक सभेचे वेळीं शेअरहोल्डरांना चहा-चिवडा-बटाटावडा-आइस्क्रीम-ड्रिंक वगैरे देण्याची प्रथा आहे. त्या वेळीं शेअरहोल्डर्स त्यावर कसे तुटून पडतात, हें पहाण्याजोगें असतें. एकादशीच्या दिवशीं सभा असली, तर कित्येक शेअरहोल्डर्स खिचडीबरोबर केकहि खातांना आढळतात; चहावर आइस्क्रीम घेतात. डायरेक्टरांना हेंच हवें असतें; शेअरहोल्डरांचें लक्ष त्यामुळें ताळेबंदाकडे न लागता, डिव्हिडंडच्या दरापेक्षा खाद्य-पेयांच्या बोनसकडे लागून रहातें आणि सभेचें काम सुरळीतपणें, अडथळे न येतां, पार पडतें. मनुष्यस्वभावाचा, त्याच्या आधाशीपणाचा, व्यावहारिक उपयोग करण्यांत अमेरिकन कंपन्या तरबेज आहेत. त्यांतील गोम लक्षांत आली, तरी फुकट खायला मिळण्यांतला आनंद, त्याचें आकर्षण, ह्यांचा अधिक प्रभाव पडतो, असा अनुभव आहे.

एका सुप्रसिद्ध ब्रिटिश कंपनीच्या चेअरमननें कंपनीच्या वार्षिक सभेचे वेळीं देण्यांत येणारीं खाद्य-पेयें बंद केलीं, तेव्हां शेअरहोल्डर्सची उपस्थिति ३,००० वरून ३५० वर उतरली. अमेरिकन टेलिफोन अँड टेलिग्राफ कंपनीच्या वार्षिक सभेला १९६१ सालीं २०,००० शेअरहोल्डर्स हजर होते; त्यांच्या खाण्यापिण्याप्रीत्यर्थ कंपनीला सुमारें २० लक्ष रु. खर्च आला. १७,८०० रोस्ट बीफचा आणि टर्की सँडविचीसचा शेअरहोल्डर्सनीं फडशा पाडला; १,१०० गॅलन कॉफी ते प्याले. शेवटची घंटा होऊन दोन तास झाले, तरी कांहीं शेअरहोल्डर्स बशांतून उरलेले जिन्नस खातच होते. खाद्य-जिनसांसाठी त्यांना रांगेंत एकेक तास उभें राहावें लागले; १,००० शेअरहोल्डर्स लंच न मिळाल्यामुळें खवळले; त्यांनीं खूप आरडाओरडा केला. ह्या पुढील सभांचे वेळीं अल्पोपाहार द्यावयाचा नाहीं, असें कंपनीनें ठरविलें, त्यामुळें १९६३ सालच्या सभेला फारच कमी शेअरहोल्डर्स गेले.

शेअरहोल्डर्सची आर्थिक व सामाजिक पार्श्वभूमि लक्षांत घेतली, तर त्यांची फुकट खायला मिळण्याची धडपड मूर्खपणाची, अविवेकी वाटते. पण मोफत फराळाच्या आकर्षणानें शेअरहोल्डर्सची उपस्थिति वाढते, हें सत्य आहे. हाउस ऑफ लॉर्ड्सच्या सभासदांप्रमाणें शेअरहोल्डरांना सभांना हजर राहाण्याबद्दल मोबदला देण्यांत यावा काय ? शिकागोमधल्या एका कंपनीच्या वार्षिक सभेचे वेळीं आणलेले फराळाचे जिन्नस संपले, तेव्हां शेजारच्या हॉटेलांतून शेअरहोल्डरांची खाण्याची मोफत सोय करावी लागली; तेव्हां ते शांत झाले. कंपनीनें शेअरहोल्डरांचा हा "हक्क" एकदा मान्य केला, कीं त्यांची भूक वाढत जाणार, हें उघड आहे. अमेरिकेंतील आर्थिक वृत्तपत्रांतून, कंपन्यांनीं दिलेल्या फराळाच्या जिनसांवर टीका करण्यांत येते; शेअरहोल्डरांना सभास्थानीं आणण्यासाठी मोटारींची व्यवस्था करण्याची व्यवस्थापकांवर जबाबदारी आहे, असें प्रतिपादन केलें जातें. "कांहीं कंपन्या सभेनंतर अल्पोपहार देतात, तर कांहीं कंपन्या कांहींच खायला-प्यायला देत नाहींत; डायरेक्टर्स व त्यांचे स्नेही ह्यांना मात्र जेवण मिळतें. हें सर्व मला आधीं माहीत असतें, तर शेअर्स घेण्याच्या फंदांत मी पडलों नसतों" अशी तक्रार 'फिनॅन्शिअल टाइम्स'मध्यें एकानें केली आहे !

ब्रिटिश कंपन्यांच्या सभांना कांहीं मिनिटेंच पुरतात; पाश्चात्त्य जगांतील कोणत्याच इतर देशांतील कंपन्यांच्या सभांना इतके कमी शेअरहोल्डर्स उपस्थित नसतात. डायरेक्टरांच्या विधानांवर फारशी टीका होत नाहीं. त्यामुळें तेथील कंपन्यांना सभेचे वेळीं फराळाची व्यवस्था करण्याची आवश्यकता वाटत नाहीं. अमेरिकेंत परिस्थिति ह्याच्या अगदीं उलट आहे. तेथें शेअरहोल्डर्सची गर्दी लोटते, प्रतिपक्षाचे शेअरहोल्डर्स प्लॅटफॉर्मवरील लोकांवर तोंडसुख घेतात, सभा कित्येक तास चालतात आणि सभांचे विस्तृत वृत्तांत तिखट-मीठ लावून वृत्तपत्रांतून छापून येतात.

शेअरहोल्डर्स मोठ्या संख्येनें सभांना आले, तर डायरेक्टरांना सुखावह वाटत नाहीं; तें शेअरहोल्डरांच्या नाखुषीचें लक्षण मानलें जातें. शेअरहोल्डरांना आपला मालकी हक्क गाजविण्यास कठीण जावें, म्हणून अमेरिकेंतील कित्येक कंपन्या आपल्या सभा अगदीं लांबच्या ठिकाणीं मुद्दामच घेतात; हेतु हा कीं फारसे शेअरहोल्डर्स सभेस येऊच नयेत. दुपारीं १२ वाजतां सभा घ्यावयाची; भूक लागली कीं शेअरहोल्डर्स जेवणासाठी बाहेर पडतात आणि मग इकडे उपस्थिति कमी उरते; सभेचें काम झटपट उरकून टाकणें शक्य होतें. जेवणासाठी सभा तहकूब न केल्यानें हें साधतें; तीच गोष्ट फराळाची मोफत व्यवस्था केल्यानेंहि साध्य होते. बहुतेक शेअरहोल्डर्स शेजारच्या दालनांतील खाण्याच्या टेबलांभोंवतीं घुटमळतात आणि इकडे चेअरमनला काम पार पाडणें सोपें जातें.

आपल्या जनतासंपर्क अधिकाऱ्यांच्या सल्लयावरून कित्येक अमेरिकन कंपन्या वार्षिक सभा मुद्दाम आकर्षक करीत आहेत. त्यांचीं वर्णनें छापून आलीं म्हणजे कंपनीच्या शेअर्सची स्टॉकएक्स्चेंजवरील किंमत वाढते, अशी कल्पना. निदान, सभेचे वृत्तांत छापून येण्यास मदत होते; उपस्थित शेअरहोल्डर्समध्यें कंपनीचा माल खपतो. कंपनीच्या मालाचें नवीन मॉडेल दाखविणें, कारखाना दाखवण्याची व्यवस्था करणें, फिल्म दाखविणें, भेटीच्या वस्तू वाटणें आणि, अर्थात्, मोठी मेजवानी देणें, ह्या मार्गें कंपन्यांचे चेअरमन सभेची जत्रा करून टाकतात. भेटीच्या वस्तू इतरांच्या आधीं मिळविण्यासाठी शेअरहोल्डर्सची धडपड चालते, त्यानें एकच गोंधळ उडतो. एका कंपनीची वार्षिक सभा एका मजल्यावर होती, पण फराळाची व्यवस्था वेगळ्या मजल्यावर होती. मग शेअरहोल्डर्स त्या वेगळ्या मजल्यावरच घुटमळत राहिले; सभेला थांबलेल्या लोकांचें लक्षहि चर्चेपेक्षा बाहेर पडण्याकडेच अधिक होतें.

'दि फेडरेशन ऑफ वुइमेन शेअरहोल्डर्स इन् अमेरिकन बिझिनेस'च्या अध्यक्ष, मिसेस सॉस, ह्यांच्यामुळेंच कित्येक कंपन्यांतून शेअरहोल्डरांना मोफत लंच देण्याची प्रथा सुरू झाली. ह्याउलट, उपाध्यक्ष मिसेस केलेकिअन ह्यांच्या मतें, कंपन्यांनीं दिलेल्या ह्या लंचेसमुळें वार्षिक सभांचें स्वरूप विकृत होऊन जातें. फुकट मिळणाऱ्या टर्की सँडविचिसकडे नजर ठेवणारे शेअरहोल्डर्स सभेंतील विधायक टीकेच्या भाषणांकडे दुर्लक्ष करतात, असें त्यांचें म्हणणें आहे. मोफत लंच, अल्पोपाहार, ह्यामुळें कांहींची तात्पुरती तृप्ति झाली, तरी शेअरहोल्डरांच्या सबंध वर्गाचेंच अंतिम नुकसान होतें, असें त्यांचें मत आहे.

कंपन्यांचे मालक (शेअरहोल्डर्स) आपल्या नोकरांच्या (बोर्ड ऑफ डायरेक्टर्स) कामाचा आढावा घेण्यासाठी वार्षिक सभेच्या वेळीं एकत्र येतात, त्या वेळीं अल्पोपाहार आणि फराळ ह्यामुळें सभेचें गांभीर्य उरत नाहीं. अगदीं लांबच्या ठिकाणीं कंपनीची सभा भरणार असेल, तर शेअरहोल्डरांची सोय पाहाणें योग्य ठरेल. अन्नपदार्थ तयार करणाऱ्या कंपन्यांनीं आपलेच पदार्थ शेअरहोल्डरांना खायला द्यावयास हरकत नाहीं. 'अमेरिकन कॅन' ही कंपनी कुणाचाहि वेळ वाया न घालवतां, विधायक टीका करणाऱ्या शेअरहोल्डरांच्या भाषणांत व्यत्यय न आणतां, आपल्या मालकांची म्हणजे शेअरहोल्डरांची बडदास्त राखते. सभेस येणारांसाठी ती कंपनी खास बसेसची व्यवस्था करते आणि त्या बसेसमध्येंच शेअरहोल्डरांना खायला-प्यायला देते!

## ध्वनीपेक्षा अधिक वेगानें विमानप्रवास

विमानांच्या प्रवासांतील नवें युग ध्वनीपेक्षाहि अधिक वेगानें झेपावणाऱ्या विमानांच्या साह्यानें सुरू होणार आहे. १९७५ च्या सुमारास विमानानें प्रवास करणाऱ्या प्रवाशांपैकी ४३ टक्के प्रवासी स्वनातीत प्रचंड विमानानें प्रवास करतील असा अंदाज करण्यांत आला आहे. त्या सुमारास अमेरिका अशा प्रकारचीं २१५ विमानें पुरवूं शकेल. हीं नवीन विमानें विकत घेण्याची तयारी जगांतील ११ विमानवाहतूक कंपन्यांनीं दाखविली आहे. त्यांपैकी ७ कंपन्या अमेरिकेच्या बाहेरील आहेत. एअर इंडिआ इंटरनॅशनलचे अध्यक्ष श्री. जे. आर. डी. टाटा ह्यांनीं विमानांच्या खरेदीसाठी २ लाख डॉलर्सचा चेक अमेरिकेच्या फेडरल एव्हिएशन एजन्सीला दिला आहे. ही रक्कम म्हणजे विसाराचीच रक्कम आहे. अमेरिकेंत तयार होणाऱ्या विमानांपैकी ठराविक अनुक्रमानें तयार होणारीं विमानें अमेरिका एअर इंडिआला देणार आहे. परंतु विमानें घेण्याचें बंधन मात्र कंपनीवर नाहीं. जरूर पडल्यास कंपनी आपला हक्क सोडून देऊं शकेल. अमेरिका तयार करीत असलेल्या विमानांप्रमाणेंच ब्रिटिश आणि फ्रेंच विमानकंपन्यांचा एक गटहि स्वनातीत विमानें तयार करणार आहे. अमेरिकन विमानांच्या मानानें ह्या विमानांची प्रवासाची कक्षा आणि वजन वाहून नेण्याचें सामर्थ्य, दोन्हीहि कमी आहेत. अशा प्रकारचीं विमानें बांधण्याचे प्रयत्न रशिआंतहि चालू आहेत. खुद्द अमेरिकेंत नव्या विमानांचें काम नकाशे तयार करण्यापलीकडे गेलेलें नाहीं. तरीपण सुमारें १० वर्षांच्या कालांत ती तयार होऊं लागतील. विमानें बांधण्यासाठी येणाऱ्या खर्चाची नीटशी कल्पना आलेली नाहीं. परंतु प्रत्येक विमानाला सुमारें २·५० ते ३ कोटी डॉलर्स लागतील, असा अंदाज आहे.


# दि सरदार कारबोनिक गॅस कंपनी लि.

उत्पादक

**कारबोनिक ॲसिड गॅस**

**सुका बर्फ, सोडा वॉटर मशिनरी**

आणि

**खनिज पाण्याच्या आवश्यकतेसंबंधीं विक्रेते**

रजिस्टर्ड हेड ऑफिस आणि एजन्टस्चें ऑफिस

सर विठ्ठलदास चेंबर्स, १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

फॅक्टरी ऑफिस : कॅनॉट रोड, माझगांव, मुंबई. टे. नं. ४०८१२

शाखा आणि फॅक्टरी

१ केडल रोड, दादर, फ्रिझाइट फॅक्टरी टे. ६१११९
२ काम्पटी फॅक्टरी एरिया, रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेस, काम्पटी (कँट) टे. १०८
३ दिल्ली–रामबाग रोड, बंगेश पूल टे. २२४७०१
४ कलकत्ता–१०३ ए फोरशोर रोड, शिवपूर, हावरा. टे. ६७–२२४७
५ विजयवाडा–गुणदला, कृष्णाजी स्ट्रीट, आंध्र प्रदेश टे. २०४१
६ रावळपिंडी–डलहौसी रोड.

सर्व शाखांसाठी आणि फॅक्टऱ्यांसाठी टेलिग्राफिक पत्ता : 'कारबोनिक'

## अमेरिकन भांडवलदारांना पूर्वीपेक्षा अधिक आस्था

इंडियन इन्व्हेस्टमेंट सेंटरचे अध्यक्ष श्री. जी. एल. मेहता ह्यांनीं सेंटरच्या तिसऱ्या वर्षदिनानिमित्त भाषण करतांना परदेशीय भांडवल भारतांत येण्यास पूर्वीपेक्षा अधिक उत्सुक आहे, अशी माहिती सांगितली. ते म्हणाले कीं, गेल्या कांहीं महिन्यांत अमेरिकेत भारतांत भांडवल गुंतविण्याविषयीं अधिक आस्था दिसून येत आहे. येत्या एप्रिल महिन्यांत अमेरिकन उद्योगपतींचें एखादें प्रतिनिधि मंडळहि भारताला भेट देईल अशी आशा वाटत आहे. १९६२ साल अखेर चीननें भारतावर हल्ला केल्यावर अमेरिकन भांडवलदार चांगलेच बिचकले होते. गेल्या वर्षाच्या भारत सरकारच्या अंदाजपत्रकांत जादा नफ्यावर कर बसविण्यांत आला, त्याचाहि विपरीत परिणाम झाला. त्यानंतर अलीकडे वातावरण निवळलें असलें तरी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या भाषेमुळें परदेशीय भांडवलदारांना थोडीशी अस्वस्थता अजूनहि वाटत आहे. परदेशी भांडवलाच्या सहकार्यानें आणि भारत सरकारच्या मदतीनें ५७ औद्योगिक संघटना उभारण्याचें ठरलें आहे. ह्या सर्व संघटनांचें मिळून भांडवल सुमारें ५० कोटी आहे. ह्या भांडवलापैकी ५.५ कोटी रुपयांचें भांडवल परदेशी असून साधारण भाग भांडवलाच्या स्वरूपांत आहे. परदेशी भांडवलाच्या मदतीनें काढावयाच्या आणखी १५ औद्योगिक संघटनांच्या योजना भारत सरकारकडे पाठविण्यांत आल्या आहेत. त्यांना अजून सरकारची मंजुरी मिळावयाची आहे. त्याशिवाय आणखी ८५ औद्योगिक कारखान्यांबाबत हिंदी कारखानदार आणि परदेशी कारखानदार ह्यांच्यांत वाटाघाटी चालू आहेत.

## सरकारच्या धोरणानें प्रगतीला पायबंद

एअर इंडिआ इंटरनॅशनलचे अध्यक्ष श्री. जे. आर. डी. टाटा ह्यांनीं हिंद सरकारच्या आर्थिक व औद्योगिक धोरणाविषयीं तक्रार करणारी एक मुलाखत अमेरिकेंतील न्यूयॉर्क हेरल्ड ट्रायब्यून पत्राला दिली आहे. मुलाखतींत ते म्हणतात कीं, हिंद सरकार आपल्या धोरणामुळें उद्योगधंद्यांच्या प्रगतीला अडथळे उत्पन्न करीत आहे. हिंदमध्यें सध्यां संमिश्र अर्थव्यवस्था चालू आहे. ह्या अर्थव्यवस्थेला विरोध करण्याचें कारण नाहीं. परंतु भारतांत समाजवाद हा कल्याणकारी राज्य स्थापन करण्याचें साधन न राहातां त्याचें साध्यांतच रूपांतर झालेलें आहे. भारतांत आर्थिक विकास होण्यास अद्याप पुष्कळच वाव आहे. मात्र खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांची वाढ होण्यास योग्य तें वातावरण निर्माण करण्यांत आलें पाहिजे; होत आहे मात्र ह्याच्या उलट. खाजगी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांच्या वाढीस सरकारच्या सर्वंकष आणि क्लिष्ट निर्बंधांमुळें अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळें स्थानिक उद्योगधंदे काढण्यास प्रेरणाच होत नाहीं. भारताच्या औद्योगिक विकासासाठीं परदेशी भांडवलाची अतिशय गरज आहे. पण सरकारी धोरणामुळें परदेशी भांडवल भारतांत येण्यास फारसें तयार नसतें.

## नागपूर–अहमदाबाद गाडी पाहिजे

विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स आणि अकोला प्रवासी संघ ह्यांनीं मिळून रेल्वेखात्याला अशी विनंती केली आहे कीं, नागपूर आणि अहमदाबाद ह्यांच्या दरम्यान धांवणारी एक एक्सप्रेस गाडी सुरू करण्यांत यावी. विदर्भ, खानदेश आणि गुजरातमधील लोकांना ह्या गाडीचा अतिशय उपयोग होईल, असें संघटनेतर्फे सांगण्यांत आलें आहे.

## बोकॅरो येथील पोलादाचा कारखाना

बोकॅरो पोलाद कंपनीची नोंदणी लवकरच करण्यांत येणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठीं ४० इंजिनिअर्स आणि ५०० तंत्रज्ञ प्राथमिक काम करीत आहेत. त्याच्या उभारणीसाठीं देशांतूनच किती यांत्रिक साधनें मिळवितां येतील तें अजमावण्यासाठीं तंत्रज्ञांची एक कमिटी नेमण्यांत आली होती. कमिटीच्या मतानें, कारखान्यासाठीं लागणाऱ्या यंत्रसामग्रीपैकीं ५० ते ७५ टक्के साधनें देशांतच तयार करतां येतील. यंत्रसामग्री तयार करणाऱ्या कारखान्यांचे प्रतिनिधी आणि भारी यंत्रसामग्रीचे सरकारी कॉर्पोरेशन ह्या प्रश्नाचा आणखी अभ्यास करणार आहेत. बोकॅरो कारखान्याचें प्राथमिक अवस्थेंत १५ लाख टन पोलादाचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलेलें आहे. तें गांठण्यासाठीं परदेशीय चलनांतहि कांहीं भांडवल लागेल.

## अनुबोधपटाला खास पारितोषिक

बर्लिन येथें शेतीविषयक चित्रपटांची तिसरी आंतरराष्ट्रीय स्पर्धा नुकतीच भरविण्यांत आली होती. त्यांत एका भारतीय चित्रपटाला सहा हजार रुपयांचें खास पारितोषिक देण्यांत आलें आहे. चित्रपट भारत सरकारच्या माहिती आणि नभोवाणी खात्यानें तयार केलेला आहे. अप्रगत देशांत दार्खविण्यास तो अतिशय उपयुक्त आहे, असें स्पर्धेच्या परीक्षकांचें मत आहे. ओरिसांत १९६० सालापासून संयुक्त राष्ट्रसंघटनेतर्फे आहारांत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयोग चालू करण्यांत आला आहे. ओरिसांतील लोकांच्या आहारांत ह्या प्रयोगापासून बरेच मोठे बदल झालेले आहेत. ह्या बदलांचें चित्रण अनुबोधपटांत फार प्रभावी पद्धतीनें करण्यांत आलेलें आहे. लोकांच्या आहारविषयक संवयींत बदल घडवून आणला तर अविकसित देशांतील अन्नधान्याच्या टंचाईचा प्रश्न सोडविणें सुलभ होईल, असें तज्ज्ञांचें मत आहे.

## बारामती शहराची पाणीपुरवठ्याची योजना

बारामती नगरपालिकेनें शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याची योजना आखली आहे. योजना अमलांत आणण्यासाठीं ६ ते ७ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. ह्या कामासाठीं नगरपालिकेला आयुर्विमा कॉर्पोरेशनकडून ६ लाख रुपयांचें कर्ज मंजूर करण्यांत आलें आहे. कॉर्पोरेशननें हें कर्ज दीर्घ मुदतीचें म्हणून दिलें आहे. कर्जावरील व्याजाचा दर ५.५ टक्के राहणार असून, बारामती नगरपालिकेनें २० वार्षिक हप्त्यानें कर्जाची फेड करावयाची आहे. ह्या योजनेचें सर्व काम राज्य सरकारचें सार्वजनिक आरोग्यखातें करणार आहे. काम पूर्ण होण्यास १९६५ साल उजाडेल. बारामती शहर हें व्यापारी व बागाईत शहर असून शहराला पाण्याचा नीटसा पुरवठा नाहीं. विशेषतः उन्हाळ्यांत पाण्याची टंचाई फार जाणवते.

## नेपाळमध्यें साखरेची टंचाई

नेपाळ राज्यांतील कांहीं भागांत साखरेची फार चणचण भासत आहे. ती दूर करण्यासाठीं नेपाळनें भारताकडे आणखी ७० हजार मण साखरेची मागणी केली आहे. साखरेची साठेबाजी झाल्यामुळें ही टंचाई कांहीं प्रमाणांत उद्भवलेली आहे. नेपाळ व भारत ह्यांच्या दरम्यान साखरेच्या पुरवठ्यासंबंधीं एक करार करण्यांत आलेला आहे. करारांतील अटीप्रमाणें साखरेच्या चालू हंगामांत भारतानें नेपाळला ८० हजार मण साखर पुरवावयाची आहे. नेपाळला पुरविण्यांत आलेली साखर पुन्हां निर्यात करण्यांत येते अशा अफवा आहेत.

### जरूरीपेक्षा जास्त एंजिनियर्स होण्याविरुद्ध दक्षता

हिंदमधील माणूसबळाचा प्रत्यक्ष उपयोग कसा केला जात आहे ह्यासंबंधीं संशोधन करण्यासाठीं भारत सरकारनें १९६२ सालीं एक संस्था स्थापन केली आहे. ह्या संस्थेनें, शिकून तयार होणारे एंजिनिअर्स व तंत्रज्ञ ह्यांना भावी काळांत उपलब्ध होऊं शकणाऱ्या रोजगाराविषयीं संशोधन चालविलें होतें. संशोधनानंतर काढण्यांत आलेले प्राथमिक निष्कर्ष आतां हातीं आले आहेत. संस्थेनें अशी सूचना केली आहे कीं, चालू पंचवार्षिक कार्यक्रमाच्या शेवटच्या वर्षापासून एंजिनिअरिंगच्या विविध शाखांचें शिक्षण देणाऱ्या संस्थांचा विस्तार करण्याचें तीन वर्षेंपर्यंत थांबविण्यांत यावें. तसें न केल्यास ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत एंजिनिअर्सची संख्या जरूरीपेक्षा अधिक होण्याची शक्यता आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत शिकवून तयार करावयाच्या एंजिनियर्सचें व तंत्रज्ञांचें जें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें तें नंतर कार्यक्रमाच्या मध्याला दुरुस्त करण्यांत आलें आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठीं हें जें दुरुस्त उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे, तें जर गाठलें गेलें तर ४थ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत जरूरीपेक्षा ३० हजार एंजिनिअर्स व तंत्रज्ञ अधिक होतील, असा निष्कर्ष संस्थेनें काढला आहे. म्हणून एंजिनिअरिंगच्या शिक्षणाच्या सोयी वाढविण्यास आळा घालण्याची सूचना संस्थेनें केली आहे. तसें केल्यानें चवथ्याच काय पण पांचव्या पंचवार्षिक कार्यक्रमांतहि एंजिनिअर्स व तंत्रज्ञ ह्यांची चणचण भासण्याची भीति नाहीं, असेंहि मत संस्थेनें व्यक्त केलें आहे.

### कोटा येथील जलविद्युत् केंद्र

राजस्थानांत कोटा येथें बांधण्यांत येणाऱ्या जलविद्युत् केंद्राला साह्य म्हणून कॅनेडिअन सरकारनें ८० लाख डॉलर्सचें कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. हें कर्ज धरून कॅनडानें भारताला अलीकडे दिलेल्या कर्जाची रक्कम आतां ३.७ कोटी डॉलर्स झाली आहे. त्याशिवाय राणा प्रताप ह्या ठिकाणीं भारतामधील दुसरें अणुशक्तिजन्य वीज केंद्र उभारण्यांत येणार आहे. येत्या कांहीं वर्षांत भारताला कॅनडाकडून ह्या केंद्रासाठीं आणखी ३.७ कोटी डॉलर्स मिळणार आहेत. राणा प्रताप येथील केंद्रासाठीं एकूण ७.३८ कोटी डॉलर्स अथवा ३२ कोटी रुपये खर्च येणार आहे. त्यांपैकीं परदेशीय चलनांत येणारा सर्व खर्च कॅनडाकडून भागविण्यांत येत आहे. बाकीचा, रुपयांतील चलनाचा खर्च भारत सरकार करणार आहे. राणा प्रताप अणुशक्ति वीजकेंद्रासाठीं कॅनडाकडून पुरविण्यांत येणारे आराखडे व नकाशे भारताला इतर अशाच केंद्रासाठींहि वापरतां येतील.

### आसाममधील नवा रेल्वेचा पूल

उत्तर आसाममध्यें लखीमपूर नजीक सुबनसरी नदीवर बांधण्यांत आलेल्या नव्या पुलाचें उद्घाटन करण्यांत आलें. लांबीच्या बाबतींत आसाममधील रेल्वेच्या पुलांत हा दुसऱ्या क्रमांकाचा पूल आहे. पूल बांधण्यासाठीं १४३ लाख रुपये खर्च आला. पुलाची लांबी २,७३० फूट असून पुलाला १३ कमानी आहेत. प्रत्येक कमानीमधील अंतर २०० फुटांचें आहे. पुलावरून एकेरी वाहतुकीचीच सोय आहे.

### निर्धन विधवांना पेन्शन

स्वतःचा योगक्षेम चालविण्यास असमर्थ असलेल्या आणि प्राप्तीचें कांहीं साधन नसलेल्या विधवांना पेन्शन देण्याचें केरळ सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं चालू आर्थिक वर्षांत २ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.


सरदारगृह


मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :-३८३३७ | सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र सरकारनें तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग




तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंपस्





१" ते ४" बेल्ट ड्राईव्ह व डायरेक्ट कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंपस्, हँड रहाट इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES



Make doubly sure by fitting

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

## बीजवाहक केबल्सचा तिसरा कारखाना

हिंद सरकारचे पोलाद आणि खाणीखात्याचे मंत्री श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांनीं मध्यप्रदेशांत सटना ह्या ठिकाणीं वीजवाहक तारा तयार करणाऱ्या कारखान्याचें उद्‌घाटन केलें. ह्या कारखान्यासाठी २.२५ कोटी रुपयांचें भांडवल लागलेलें आहे. कारखान्याचे मालक बिर्ला बंधू हे आहेत आणि त्याचा विस्तार १०० एकर जागेवर पसरलेला आहे. अशा प्रकारच्या तारा करणारा हा भारतामधील तिसरा कारखाना आहे. तो उभारण्याच्या कामीं ब्रिटनमधील एका कंपनीचें साह्य बिर्ला बंधूंनीं मिळविलें आहे. कारखान्यांत एकच पाळी चालविण्यांत आली तर त्यांत दरसाल सुमारें ८५० मैल लांबीच्या तारा तयार होऊं शकतील. कारखान्यांत तीन पाळया चालू करण्यांत आल्या तर त्याचें वार्षिक उत्पादन २ हजार मैल लांबीच्या तारांइतकें होईल. कारखान्याचें उद्‌घाटन करतांना श्री. सुब्रह्मण्यम् म्हणाले कीं, भारताच्या उद्योगधंद्याच्या विकासांत मुख्य अडचण आहे, ती प्रशिक्षित कामगारांची. त्यांची पुरेशी संख्या असूनहि उपलब्ध नाहीं. भारतांत नवनवीन उद्योगधंदे स्थापन करण्यांत येत आहेत. परंतु ते चालविण्यासाठी लायक माणसांचा मात्र तुटवडा आहे. अशा परिस्थितींत परदेशांतून नुसती यंत्रसामग्री आणवून उद्योगधंद्यांचा विकास साधणार नाहीं. कारण, योग्य माणसांच्या अभावीं आणलेल्या यंत्रसामग्रीचा पुरेपूर उपयोग करतां येणार नाहीं. परिणामीं, उत्पादनांत अपेक्षेप्रमाणें वाढहि होणार नाहीं. कारखान्यांच्या चालकत्वाची जबाबदारी स्वीकारणारा व्यवस्थापक वर्गहि हिंदमध्यें पुरेशा प्रमाणांत नाहीं.

## छोट्या नाण्यांसाठी नवी टांकसाळ

भारत सरकारनें छोटीं नाणीं पाडण्यासाठी एक आधुनिक धर्तीची टांकसाळ म्हैसूर राज्यांत काढण्याचें ठरविलें आहे. ही टांकसाळ कोलार येथील सोन्याच्या खाणीजवळ उभारण्यांत येणार आहे. हैदराबाद येथें सध्यां छोटीं नाणीं पाडणारी टांकसाळ आहे. परंतु तेथील यंत्रसामग्री आतां फार जुनी झालेली असल्यानें नव्या टांकसाळीची आवश्यकता भासत आहे. कोलार खाणींच्याजवळ मध्यवर्ती सरकार मातीचे ढिगारे हलवणारी मोठीं यांत्रिक फावडीं तयार करण्याचा कारखानाहि काढणार आहे. अलीकडे कोलार खाणींतील एक खाण बंद करण्यांत आली. त्यामुळें बरेच कामगार बेकार झाले आहेत. बेकार झालेल्या कामगारांना यांत्रिक फावड्यांच्या कारखान्यांत आणि नव्या टांकसाळींत रोजगार देण्यांत येणार आहे.

## सांगलीला सहकारी सूत गिरणी

सांगली जिल्ह्यांतील प्रमुख नागरीक आणि सहकारी क्षेत्रांत काम करणारे कार्यकर्ते ह्यांनीं सांगली येथें सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारी एक सुताची गिरणी काढण्याचें ठरविलें आहे. हें काम पार पाडण्यासाठी ३५ जणांची कमिटी नेमण्यांत आली आहे. गिरणींत सूत काढण्याच्या २५ हजार चात्या असतील.

## प्रचारासाठी नवा ध्वनिक्षेपक

चीनच्या भारतविरोधी प्रचाराला चोख रीतीनें तोंड देण्यासाठी मोठ्या शक्तीचा ध्वनिक्षेपक खरेदी करण्याची तयारी भारतातें माहिती व नभोवणी खातें करीत आहे. झेकोस्लोव्हाकिआजवळ ४०० किलोवॅट शक्तीचे दोन ध्वनिक्षेपक आहेत. जरूर पडल्यास दोन्हींवरून संयुक्तरीत्या ध्वनिक्षेपण करतां येण्यासारखें आहे. झेकोस्लोव्हाकिआकडून ते मिळण्यासारखे आहेत. भारत—सरकारला त्यासाठी १ कोटी रुपये खर्चावे लागतील. जे देश भारताकडून रुपयाच्या चलनांत किंमत घेत असतील, त्यांपैकी कोणत्याहि देशाकडून ध्वनिक्षेपक घेण्यास अर्थखात्यानें संमति दिली आहे. हंगेरीकडूनहि असा ध्वनिक्षेपक मिळण्याची शक्यता आहे.

## छोट्या उद्योगधंद्यासाठी लोखंडाची आयात

रशिआकडून भारत १० लाख टन कच्चें लोखंड मागविण्याचा विचार करीत आहे. छोट्या प्रमाणावरील ओतकाम करणाऱ्या भट्ट्यांना अशुद्ध लोखंडाची टंचाई भासत आहे. ती दूर करण्यासाठी ही आयात करावी लागणार आहे. छोट्या भट्ट्यांना किमान २० लाख अशुद्ध लोखंडाचा पुरवठा लागतो. परंतु फक्त १० लाख टन लोखंडच त्यांना मिळूं शकत आहे. लोखंडाच्या अपुऱ्या साठ्यामुळें छोट्या भट्ट्यांना आपलें उत्पादन चालूं ठेवतां येणें कठीण होत चाललें आहे. ज्या ठिकाणीं लोखंडाचा विपुल साठा असेल त्या ठिकाणीं विजेच्या साह्यानें चालणाऱ्या व लाकडाच्या कोळशाच्या भट्ट्या स्थापन करण्यांत आल्या तर लोखंडाचा पुरवठा सुधारेल अशी अपेक्षा आहे.

## शस्त्रकपात आर्थिक अडचणींमुळें नाहीं

रशिआचे पंतप्रधान मि. क्रुश्चोव्ह ह्यांनीं कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीपुढें रशिआंतील शेती व उद्योगधंद्याच्या विकासासंबंधी केलेल्या भाषणांत असें सांगितलें कीं, रशिआंत निर्माण झालेल्या आर्थिक अडचणींमुळें त्यानें शस्त्रसंभारांत कपात करण्याचा निर्णय घेतला, हें म्हणणें चुकीचें आहे. रशिआच्या आर्थिक विकासाचा वेग अमेरिकेपेक्षा कमी आहे, हें म्हणणेंहि वस्तुस्थितीस सोडून आहे. तथापि, भांडवलदारी देशांतिल शास्त्रांची प्रगति आणि शेतीचें उत्पादन ह्या दोन्हींचा रशिआंत कसून अभ्यास करण्यांत आला पाहिजे. अशा अभ्यासामुळें रशिआंतील शेतीच्या उत्पादनांत अवश्य असणारी सुधारणा अंमलांत आणणें सुलभ जाईल.

## प्रवाशांसाठीं हॉटेल्सच्या अधिक सोयी

अखिल भारतीय होटेल व रेस्टारंट संघटनेची ६ वी बैठक दिल्ली येथें भरविण्यांत आली होती. तीन दिवस चाललेल्या ह्या बैठकीसाठी हॉटेलच्या धंद्यांतील बरेच परदेशीय प्रतिनिधीहि आले होते. बैठकीचें उद्‌घाटन भारत सरकारचे वाहतूक मंत्री श्री. राजबहादूर ह्यांनीं केलें. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, येत्या पांच वर्षांत भारतामधील २० शहरांतून होटेलांच्या सोयी वाढविण्यांत आल्या पाहिजेत. ह्या कालांत ३६ होटेल्समधून ५,२०० खोल्यांची सोय करावी लागेल, असा अंदाज आहे. ह्या कामासाठी २५ कोटी रुपये खर्च येईल. व त्यांतील ३.८० कोटी रुपये परदेशीय चलनांत लागतील. इतका पैसा खाजगी भांडवलांतून उभा राहाणें अवघड आहे. म्हणून ह्या क्षेत्रांत सरकार उतरलें तर तें योग्यच होईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## दि बँक ऑफ बेळगांव लि.

### १९६३ मधील प्रगति

वरील बँकेला १९६३ सालीं, ( पूर्वीच्या वर्षांचा शिल्लक नफा रु. ९००=३४ धरून आणि स्टाफला बोनस देऊन ) रु. १,७४,०७८=४५ नफा झाला; १९६२ सालीं तो रु. २,१४,९००=३४, एवढा होता.

करपात्र ९% डिव्हिडंड कायम ठेवण्याचें डायरेक्टरांनीं योजिलें आहे. रिझर्व्ह फंडांत रु. ३५,००० ( रु. ४६,००० ), इनकम-टॅक्सची तरतूद रु. ६२,००० ( रु. ९६,००० ), डिव्हिडंड ई. फंड रु. ४,००० ( पूज्य ), अशा इतर नियोजित तरतुदी आहेत. रु. १,०७८=४५ नफा ( रु. ९००=३४ ) पुढील हिशेबांत घेतला जाईल.

ठेवींत रु. ३० लक्षांची भर पडून त्यांची रक्कम रु. २·३० कोटी झाली. इन्व्हेस्टमेंटमधील रक्कम रु. ५४·३४ लक्षांवरून रु. ५७·२३ लक्षांवर गेली. दिलेल्या कर्जाची रक्कम रु. १·०८ कोटींची रु. १·३५ कोटी झाली. रिझर्व्हमधील रक्कम रु. ५·५१ लाखांची रु. ६·०२ लाख झाली.

शाखांच्या संख्येंत भर पडून बँकेच्या आतां ३१ शाखा आहेत; त्यांपैकी दोन शाखा ( मुधोळ आणि हुबळी ) १९६३ मध्यें सुरू झाल्या आणि एक शाखा ( गुळेदगुड्ड ) नुकतीच, १९६४ मध्यें, उघडण्यांत आली. हुक्केरी, राणिबेन्नूर आणि कुडची येथें शाखा उघडण्यास रिझर्व्ह बँकेचें लायसेन्स मिळालें असून म्हैसूर राज्यांतील ह्या तीनहि शाखा लवकरच सुरू करण्याचा डायरेक्टरांचा विचार आहे.

## नागार्जुन सागर धरणाला अधिक मदत

आंध्र प्रदेश राज्यांतील नागार्जुनसागर धरणाच्या कामासाठी भारत सरकारनें चालू आर्थिक वर्षांत आणखी १·७९ कोटी रुपयांची मदत देण्याचें ठरविलें आहे. १९५५–५६ पासून ह्या धरणासाठी मध्यवर्ती सरकारनें ६८ कोटी, २१ लाख रुपयांचें कर्ज दिलेलें आहे. धरणासाठी येणाऱ्या खर्चाचा पहिला अंदाज ९१·१२ कोटी रुपयांचा होता. परंतु नंतर राज्य सरकारकडून १३९·५३ कोटी रुपये खर्चाचा नवा अंदाज सादर करण्यांत आलेला आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत नागार्जुनसागर योजनेसाठी ५० कोटी रुपयांच्या रकमेची तरतूद करण्यांत आलेली आहे. भारतामधील सर्वच मोठ्या धरणयोजनांचीं कामें मंदगतीनें चालत असल्यानें त्यांच्या भांडवली खर्चांत पुन्हां पुन्हां वाढ होत जाते असा अनुभव आहे. तथापि, आंध्र राज्य सरकारनें सादर केलेला खर्चाचा नवा अंदाज धरणांतील पाणी-सांठवणी वाढविल्यामुळें पुन्हां करावा लागला असें सांगण्यांत येत आहे. नव्या अंदाजाप्रमाणें धरणाचें बांधकाम पुरें झाल्यावर त्यांत ६० लाखांपेक्षा अधिक एकर–फूट पाणी साठविता येईल. कृष्णा नदीवर बांधण्यांत येणाऱ्या ह्या धरणापासून दोन कालवे काढण्यांत येणार आहेत. शेतीला पाणी-पुरवठा करणें आणि वीजनिर्मिति करणें ह्यासाठी हें धरण बांधण्यात येत आहे. धरणांतील पाण्यामुळें सुमारें २० लाख एकर जमीन भिजविली जाईल आणि त्याशिवाय ४ लाख किलोवॅट वीज निर्माण करण्याची सोय होईल. पाणीपुरवठा झाल्यामुळें राज्यांतील धान्योत्पादन ८ लाख टनांनीं वाढणार आहे.

## चहाच्या निर्यातीमुळें मिळालेलें परदेशीय चलन

भारताच्या टी बोर्डाचे अध्यक्ष श्री. ए. एस. बाम ह्यांनीं चहाच्या निर्यातीविषयीं आणि त्यापासून मिळणाऱ्या परदेशीय चलनाविषयीं माहिती सांगितली आहे. मद्रास येथें पत्रकारांशीं बोलतांना ते म्हणाले कीं १९६३ सालांत भारतानें ४९·३ कोटी पौंड चहा परदेशांत निर्यात केला. त्यामुळें १३२·४ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ति झाली. १९६२ सालीं १२४·९ कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळविण्यांत आलें होतें. गेल्या पांच वर्षांतील चहाच्या निर्यातीचा आणि त्यापासून मिळालेल्या परदेशीय चलनाचा हा उच्चांक आहे. युरोपीय सामायिक बाजारपेठेंत भारताचा चहा लोकप्रिय व्हावा म्हणून बोर्डानें ब्रुसेल्स येथें एक कचेरी उघडली आहे. चहा उत्पादन करणाऱ्या देशांत असें पाऊल टाकलेला भारत हा पहिलाच देश आहे. त्याशिवाय लंडन येथें एक आणि ऑस्ट्रेलिआंत सिडने येथें एक कचेरी उघडण्याचा बोर्डाचा विचार आहे. न्यूयॉर्क येथें भरणाऱ्या जागतिक प्रदर्शनांतहि बोर्ड भाग घेणार आहे. युरोपमधील विमानवाहतूक कंपन्यांना भारतामधील चहा पुरविण्यांत आला आहे. १९६३ सालीं भारतामधील चहाचें एकूण उत्पादन ७५·६ कोटी पौंड झालें. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत चहाच्या उत्पादनाचें उद्दिष्ट ९० कोटी पौंड ठरविण्यांत आलें आहे. परंतु तें गाठणें जरा कठीणच जाईल. तथापि, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस चहाचें वार्षिक उत्पादन ८४ कोटी पौंडांच्या आसपास जाईल असा अंदाज आहे. १९६३ सालीं दक्षिण भारतांत चहाचें उत्पादन वाढलेलें आहे.

## आरोग्य आणि आर्थिक प्रगति

" सार्वजनिक आरोग्याला कारणीभूत होणाऱ्या सर्वांत महत्त्वाच्या बाबी कोणत्या ? " ह्या प्रश्नाचीं उत्तरें रीडर्स डायजेस्टनें भारतांतील आपल्या वाचकांकडून मागविलीं होतीं. सात बाबी प्रश्नपत्रिकेंतच दिलेल्या होत्या; आणखी कांहीं बाबी महत्त्वाच्या वाटल्या तर त्या वाचकानें सुचविण्याच्या होत्या. एकूण १,१९१ वाचकांनीं उत्तरें पाठविलीं. " अधिक अन्न आणि जास्त सकस अन्न " ही बाब ६८% वाचकांना सर्वांत महत्त्वाची वाटली; तिला त्यांनीं पहिलें किंवा दुसरें स्थान दिलें; १७% वाचकांनीं तिला तिसरें किंवा चौथें स्थान दिलें. " रहाण्याची अधिक चांगली सोय " ही बाब ४४% वाचकांनीं पहिल्या किंवा दुसऱ्या महत्त्वाची मानली; ३७% वाचकांनीं तिला तिसरें किंवा चौथें स्थान दिलें. " आरोग्याचें अधिक चांगलें शिक्षण " ह्या बाबीस ३८% वाचकांनीं पहिलें किंवा दुसरें स्थान दिलें, तर ३७% वाचकांनीं तिसरें किंवा चौथें स्थान दिलें. " अधिक चांगलें ड्रेनेज " ला ६४% वाचकांनीं पहिल्या चारांपैकी एकांत जागा दिली. त्याच्या खालोखाल " अधिक चांगलीं इस्पितळें व सोयी " ह्यास महत्त्व दिलें गेलें. ह्या सर्वांचा एक महत्त्वाचा निष्कर्ष असा, कीं सार्वजनिक आरोग्य आणि आर्थिक प्रगति ह्यांचा संबंध बहुतेकांनीं मान्य केला आहे; अन्न आणि घरें ह्यांनाच विशेष महत्त्व दिलेलें आहे आणि त्या बाबी आर्थिक प्रगतीवरच अवलंबून आहेत. रोगनिवारणाला उपचारांपेक्षा जास्त महत्त्व देण्यांत आलें आहे; अधिक चांगल्या इस्पितळांच्या मागणीचा अनुक्रम सर्वांत शेवटीं आहे. आरोग्याच्या शिक्षणाला दिलेलें महत्त्वहि सूचक आहे.

### प्रशिक्षित माणूसबळाची आवश्यकता

आर्थिक विकास घडवून आणण्याच्या कार्यांत प्रशिक्षित माणूसबळाचें महत्त्व किती आहे, तें भारताचे गृहमंत्री श्री. नंदा ह्यांनीं स्पष्ट केलें आहे. माणूसबळाच्या व्यावहारिक उपयोगाबद्दल संशोधन करणाऱ्या संस्थेपुढें बोलतांना ते म्हणाले कीं, देशाचा आर्थिक विकास आणि संरक्षक सामर्थ्य ह्या दोन गोष्टी त्वरित साध्य करण्यासाठी कुशल माणूसबळाची अतिशय आवश्यकता आहे. माणूसबळ हीच कोणत्याहि देशाची मूलभूत साधनसंपत्ति असते. भांडवल, कच्चा माल आणि इतर आवश्यक साधनांची जुळवाजुळव केली तरीसुद्धां तांत्रिक कौशल्य आणि व्यवस्थापकीय कसब अंगीं असलेलीं माणसें नसतील, तर उत्पादनाची गाडी चालू होणार नाहीं. गेल्या दहाबारा वर्षांचा नियोजनाचा आणीबाणीचा अनुभव जमेस धरतां शिकवून तयार केलेल्या मनुष्यबळाचें महत्त्व अधिकच तीव्रतेनें लक्षांत येतें. भारतांत दरसाल लाखों लोक उद्योग-विनिमय केंद्रांत रोजगारासाठीं नांवें नोंदवीत असतात. परंतु रोजगार नव्यानें शोधणाऱ्या ह्या लोकांपैकी ७० टक्के लोकांना कोठल्याच धंद्याचें अगर व्यवसायाचें शिक्षण मिळालेलें नसतें. आर्थिक विकास साधलेल्या देशांकडे नजर टाकली तर असें दिसून येतें कीं त्यांनीं कित्येक वर्षें कुशल कामगार, तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञ शिकवून तयार करण्यांत खर्च केली. भांडवल कर्जाऊ घेतां येईल, कच्चा माल व यंत्रसामग्री आयात करतां येईल; परंतु प्रशिक्षित कामगारांची उणीव अशा रीतीनें भरून काढतां येणार नाहीं.

---

### रक्तदाबावर शस्त्रक्रियेचा उपाय

रक्तदाबाच्या कांहीं विशिष्ट प्रकारच्या रोगावर यशस्वी रीत्या शस्त्रक्रिया करतां येते, असा रशियन शस्त्रवैद्यांचा दावा आहे. रक्तदाबाचा विकार बहुधा मध्यवर्ति नसांच्या जाळ्याच्या कार्यांत बिघाड झाल्यामुळें होतो. कधीं कधीं तो मूत्राशयाच्या रक्तवाहिन्या आकुंचन पावल्यामुळें अगर त्यांत अडथळा उत्पन्न झाल्यामुळेंहि होतो. अशा प्रकारच्या बिघाडामुळें मध्यम वयाच्या माणसाच्या अगर तरुणाच्या रक्तदाबांत वाढ होते. हा बिघाड शस्त्रक्रियेच्या साह्यानें दुरुस्त करतां येतो, असें रशियन डॉक्टरांचें मत आहे. मॉस्को येथील संबंधित वैद्यकीय संस्थेंत २१ रोग्यांवर रक्तदाब घालविण्यासाठी शस्त्रक्रिया करण्यांत आल्या होत्या. बहुतेक रोग्यांची प्रकृति सुधारली आणि कांहीं तर पूर्णपणें बरे झाले.

---

### अमेरिकन स्त्रियांची सद्यःस्थिति

अमेरिकेच्या माहिती खात्यानें अमेरिकेंतील स्त्री-जीवनाची आंकडेवार माहिती देणारी एक पुस्तिका काढली आहे. सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रांत चमकलेल्या अनेक प्रसिद्ध स्त्रियांची माहिती त्यांत आहेच. पण, १९०० ते १९६० ह्या कालांत समाजजीवनांत अमेरिकन स्त्रीचें स्थान कसें पालटत गेलें तें विशद करण्यांत आलें आहे. ह्या ६० वर्षांच्या कालांत घराबाहेर कामास जाणाऱ्या स्त्रियांच्या संख्येंत विलक्षण वाढ झालेली दिसून येते. १९०० सालीं घराबाहेर रोजगाराला जाणाऱ्या अमेरिकन स्त्रियांची संख्या अवघी ५० लाख होती. १९६० सालीं २.३ कोटी स्त्रिया घराबाहेरील कामें करीत होत्या. १९०० सालीं रोजगारी करणाऱ्या अमेरिकन स्त्रिया शेंकडा १८ होत्या. आतां हेंच प्रमाण ३३ टक्के झालें आहे.

---


दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ-पुणें शहर.

**व्याजाचे नवीन आकर्षक दर–**

| | | |
|---|---|---|
| चालू ठेव | ... ... | १/४ टक्के |
| सेव्हिंग्ज | ... ... | ३ टक्के |
| **कायम ठेव–** | | |
| १ महिना | ... ... | ३.३७ टक्के |
| ३ महिने | ... ... | ३.५० टक्के |
| ६ महिने | ... ... | ३.७५ टक्के |
| १ वर्ष | ... ... | ४ टक्के |
| २ वर्षें | ... ... | ४.२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर | ... ... | ४.५० टक्के |

**याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.**

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*
*सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

डी. बी. तांबट
कार्यकारी संचालक.



# दि सांगली बँक लि.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,५०,००० चे वर |
| रिझर्व्ह फंडस् | रु. १०,००,००० चे वर |
| खेळतें भांडवल | रु. ४ कोटींचे वर |

★ महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांत मिळून एकूण २२ शाखा

★ आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात व सर्व प्रकारचे बँकिंगचे अद्ययावत् व्यवहार योग्य तऱ्हेनें केले जातात.

★ हेड ऑफिस सांगली व इचलकरंजी, रविवार पेठ–पुणें आणि बेळगांव या शाखांमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्ची सोय करण्यांत आली आहे.

**अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखाधिकाऱ्यास अवश्य भेटा.**

रजिस्टर्ड ऑफिस राजवाडा चौक सांगली.

एम. के. गुप्ते
M. A., LL. B., C. A. I. I. B.
मॅनेजर.

### साखर कारखान्याच्या बोर्डावर कामगारांचे प्रतिनिधि

आंध्र प्रदेश राज्यांतील निजाम शुगर फॅक्टरींत काम करणाऱ्या कामगारांना व कारखान्यासाठी ऊंस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना कारखान्याच्या व्यवस्थापक मंडळावर प्रतिनिधित्व देण्यांत येणार आहे. हा कारखाना सरकारी मालकीचा असून सरकारच्या मालकीच्या भागभांडवलापैकी कांहीं भाग कामगारांच्या प्रतिनिधींच्या नांवावर करण्याचा विचार चालू आहे. निझाम शुगर फॅक्टरी हा कारखाना आग्नेय आशिआंतील सर्वांत मोठा कारखाना आहे. त्याची ऊंस गाळण्याची रोजची शक्ति ४,००० टनांची आहे. ती आणखी १,००० टनांनीं वाढविण्यांत येणार आहे. तसें झाल्यावर तो जगांतील एक मोठा कारखाना होईल.

### प्राचीन देवदेवतांच्या मूर्तींच्या चोऱ्या

हिंदमधील देवळांतून अगर वस्तुसंग्रहालयांतून प्राचीन देवदेवतांच्या मूर्ति चोरीस गेल्याच्या वार्ता मधूनमधून येत असतात. ह्या मूर्ती बहुधा परदेशांतील कलावस्तुसंग्रहालयांत जातात, असें आढळून आलें आहे. मथुरा येथील प्राचीन वस्तुसंग्रहालयांतून बुद्धाची एक मूर्ति नुकतीच चोरीला गेली होती. ही मूर्ति स्वित्झरलंडमधील राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयानें खाजगी रीत्या विकत घेतल्याचें उघडकीस आलें आहे. मूर्ति चोरीचा माल आहे, हें व्यवस्थापकांना माहीत नव्हतें. मूर्तीसाठी दिलेली किंमत परत करण्यांत आल्यास मूर्ति भारताला पुन्हां विकण्याची तयारी स्विस सरकारनें दाखविली आहे.

### प्रवरा सहकारी साखर कारखाना

प्रवरा सहकारी साखर कारखान्यानें चालू हंगमांत आतांपर्यंत १ लाख, ५५ हजार पांढऱ्या साखरेच्यीं पोतीं आणि १ लाख कच्च्या साखरेच्यीं पोतीं निर्माण केलीं आहेत. कारखान्याचा साखरेचा उतारा १२ टक्के पडला आहे. कारखान्यांचा चालू हंगाम नेहमींपेक्षा १ महिना उशिरा सुरू झालेला आहे. प्रवरेचा कारखाना हा भारतामधील पहिला सहकारी साखर कारखाना आहे.

Statement about ownership and other particulars about newspaper 'ARTHA' to be published in the first issue every year after last day of February.

FORM IV

(See Rule 8)

1. Place of publication 823, Shivajinagar, Poona 4
2. Periodicity of its publication — Fortnightly
3. Printer's name, — S. V. Kale
   Nationality. — Indian
   Address. — 823, Shivajinagar, Poona 4
4. Publisher's name. — S. V. Kale
   Nationality — Indian
   Address. — 823, Shivajinagar, Poona 4
5. Editor's name. — S. V. Kale
   Nationality. — Indian
   Address. — 823, Shivajinagar, Poona 4
6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital. — S. V. Kale 823, Shivajinagar, Poona 4

I, Shripad Vaman Kale, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 4-3-1964

S. V. Kale
Signature of Publisher.

### भारत सरकारचें अंदाजपत्रक

( आंकडे कोटि रुपयांचें )

| | अर्थसंकल्प (१९६३–६४) | दुरुस्त (१९६३–६४) | अर्थसंकल्प (१९६४–६५) |
|---|---|---|---|
| महसूल | १८३६·१८ | १९१३·६८ | २०९५·१२ |
| खर्च | १८५२·४० | १८२५·३४ | २०४१·३१ |
| | + १६·२२ | + ८८·३४ | + ५३·८१ |


### The Bank of Karad Ltd., Karad.

**NOTICE**

Notice is hereby given that the Eighteenth Annual General Meeting of the Share-holders of the Bank of Karad Limited will be held at the Registered Office of the Bank at 15 Raviwar Peth, Karad, on Monday the 23rd March 1964 to receive and consider the Balance Sheet, Profit and Loss Account and the Reports of the Directors and of the Auditors for the year ended 31st December 1963, to declare dividend, to elect Directors, to appoint auditors etc., as per notice sent to the Shareholders.

KARAD: — M. V. KHANDKAR,
26th February, 1964. — *General Manager.*

## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

: मुख्य कचेरी :
९, बेक हाऊस लेन, फोर्ट मुंबई.
टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१७

: विभागीय कचेरी :
महाल : नागपूर.
तारेचा पत्ता : फार्मर बँक

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्लें (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल ... | ४ कोटी ७५ लाख |
| गंगाजळी व फंड ... | १ कोटी ४१ लाख |
| ठेवी ... | २९ कोटी ६३ लाख |
| खेळतें भांडवल ... | ६७ कोटी ८७ लाख |

**महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

**संरक्षण निधीच्या रकमा या बँकेंत स्वीकारल्या जातात.**


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.